आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
६ नोव्हेंबर २०२६ - गुरूवार

ठळक बातम्या

- राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधल्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांना हक्काची घरं देण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- स्वाभिमानी शेतकरी संघटनेचं तीन दिवसांपासून सुरू असलेलं रस्ता रोको आंदोलन मागे

- झारखंडमध्ये भरधाव ट्रेलरच्या धडकेत सात जण ठार/ चेन्नईत रस्ते अपघातात तिघांचा मृत्यू

आणि

- लंडन खुल्या स्क्वॉश स्पर्धेत भारताच्या वेलावन सेंथिलकुमारचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

<><><><><>

राज्य सरकारच्या श्रमसाफल्य योजने अंतर्गत राज्यातील विविध महापालिका, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करणाऱ्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्कांची घरे देऊ, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत दिलं. आश्रय योजना कक्ष टप्पा-२ अंतर्गत नव्यानं बांधलेल्या कर्मचारी निवासस्थानांच्या चाव्यांचे वितरण त्यांच्या हस्ते कुलाबा इथं झालं, त्यावेळी ते बोलत होते.

- - होल्ड - मुख्यमंत्री बाइट - - - -

मुंबई शहर आणि उपनगर स्वच्छ ठेवण्याचं मोठं काम महापालिकेत कार्यरत असलेले सफाई कर्मचारी करत असतात. आज यातील काही कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची घरे मिळत असल्यानं यंदाची त्यांची दिवाळी आनंददायी असेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार उपस्थित होते.

<><><><><>

महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी NCMC कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय १ जानेवारी २०२७ पर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे. ग्रामीण भागातल्या अनेक महिला लाभार्थ्यांची कार्ड नोंदणी अद्याप पूर्ण झालेली नाही, त्यामुळे हा निर्णय घेतल्याची माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

<><><><><><>

स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं कोल्हापुरातल्या किणी टोल नाक्यावर तीन दिवसांपासून सुरू असलेलं रस्ता रोको आंदोलन मागे घेतलं आहे. त्यानंतर गेल्या तीन दिवसांपासून बंद असलेली महामार्गावरची वाहतूक पूर्ववत सुरू झाली. विनाकपात ३ हजार ९०० पहिली उचल, हंगाम संपल्यावर १०० रुपये आणि साखर दर प्रतिक्विंटल साडे ४ हजार रुपये राहिला तर आणखी २०० रुपये असा प्रस्ताव सरकारनं दिला होता. तो मान्य करत राजू शेट्टी यांनी मध्यरात्री आंदोलन मागे घेतलं. प्रवासी, वाहनधारक अन्य लोकांना झालेल्या त्रासाबद्दल शेट्टी यांनी दिलगिरी व्यक्त केली आणि आंदोलनासाठी पाठबळ दिलेल्यांचे आभार मानले.

<><><><><><>

गोकुळच्या अध्यक्ष निवडीसाठी सतेज पाटील यांनी फॉर्म्युला द्यावा, असं आवाहन मंत्री हसन मुश्रीफ यांनी आज केलं. गोकुळमध्ये अध्यक्ष निवडीसाठी १४ चा कोरम आवश्यक आहे. पण सतेज पाटील यांना १३ जणांचं पाठबळ आहे. अशावेळी निर्माण झालेल्या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी पर्याय सुचवावा असं मुश्रीफ कोल्हापुरात वार्ताहरांशी बोलताना म्हणाले.

<><><><><><>

दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना एक लाख रुपये प्रति हेक्टर सरकारी मदत मिळावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. यवतमाळ जिल्ह्यातल्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना त्यांनी भेट दिली त्यावेळी ते बोलत होते. याशिवाय शेतमजुरांना २५ हजार रुपये मदत मिळावी, तर बचत गट आणि मायक्रो फायनान्सचं कर्ज घेतलेल्या महिलांचं कर्ज माफ व्हावं अशी मागणी त्यांनी केली

आहे. कर्जाची वसुली देखील किमान दीड वर्षांपर्यंत करू नये अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

<><><><><><>

देशात आज धनत्रयोदशीचा सण उत्साहात साजरा होत आहे. आजच्या दिवशी भगवान धन्वंतरी, लक्ष्मी माता आणि कुबेर देवतेची पूजा केली जाते. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व नागरिकांना आज साजऱ्या होत असलेल्या धनत्रयोदशी सणाच्या शुभेच्छा समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशातून दिल्या आहेत.

भगवान धन्वंतरींच्या कृपेने सर्वांच्या जीवनात आनंद, शांती आणि उत्तम आरोग्य नांदो, अशी सदिच्छा या दोघांनी दिल्या आहेत. महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनीही राज्यातल्या जनतेला धनत्रयोदशी आणि दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. दीपावलीचा सण सर्वांच्या जीवनात सुख, समाधान आणि समृद्धी घेऊन येवो, अशा सदिच्छा त्यांनी दिल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही सर्वांना धनत्रयोदशीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातल्या अनेक तालुक्यांमध्ये आज वैद्यकीय क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांकडून भगवान धन्वंतरींचं पूजन करण्यात आलं. तसंच, मोफत आरोग्य तपासणी, आयुर्वेदिक तज्ञांचं मार्गदर्शन इत्यादी उपक्रमही राबवण्यात आले.

<><><><><><>

झारखंडमधील खुंटी जिल्ह्यात भरधाव जाणारा ट्रेलर रस्त्यावरच्या नागरिकांना धडकून झालेल्या अपघातात सात जण जागीच ठार झाले. मृतांमध्ये चार महिला आणि तीन लहान मुलांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली. हा अपघात काल रात्री कर्रा-तोरपा मुख्य रस्त्यावर झाला. या अपघातात एक जण जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

अपघातग्रस्त दुचाकीस्वाराला या महिला मदत करत होत्या. त्याचवेळी भरधाव वेगानं आलेल्या ट्रेलरनं महिलांना धडक दिल्यानं हा अपघात झाल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी पोलिसांना दिली. अपघातानंतर चालक आणि क्लिनर पळून गेले असून पोलिस त्यांचा शोध

घेत आहेत. अपघाताच्या ठिकाणी स्पीड ब्रेकर बसवावेत, या मागणीसाठी ग्रामस्थांनी आज सकाळी रस्ता रोको आंदोलन केलं.

दरम्यान, या अपघाताबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत, अशा भावना समाज माध्यमावरील संदेशातून व्यक्त केल्या आहेत. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी ही दुःख व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांप्रति सहवेदना व्यक्त केल्या.

<><><><><><>

तामिळनाडूत चेन्नईजवळ जुन्या महाबलीपूरम मार्गावर आज सकाळी एक वाहन बसवर आदळून झालेल्या अपघातात ३ महिला ठार झाल्या तर २० प्रवासी जखमी झाले आहेत. रस्त्यावरच्या गाईला चुकवण्याचा प्रयत्नात हे वाहन समोरून येणाऱ्या एका सरकारी बसवर आपटलं. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पुढचा पोलीस तपास सुरु आहे.

<><><><><><>

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी एका भारतीय प्रवाशांकडून साडेदहा किलो गांजा जप्त केला आहे. या गांजाची किंमत सुमारे पावणेचार कोटी रुपये आहे. बँकॉकहून पुण्याला ४ नोव्हेंबर रोजी आलेल्या या प्रवाशाने आपल्या सामानात हा गांजा लपवल्याचं स्कॅनिंग यंत्रामुळे अधिकाऱ्यांच्या लक्षात आलं. या प्रवाशावर गुन्हा दाखल झाला असून यामध्ये इतर कोणी सामील आहे का याचा तपास सुरु आहे.

<><><><><><>

ठाणे जिल्ह्यातल्या एका पोलीस ठाण्यातून सीसीटीव्ही चित्रण डिलीट केल्याच्या आरोपावरून एका पोलीस नाईकावर पुरावा नष्ट करण्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका गुन्हेगाराला पोलीस कोठडीतून पळून जाण्यासाठी मदत करताना त्याचा पुरावा असलेलं हे सीसीटीव्ही चित्रण एका अज्ञात तंत्रज्ञाच्या साहाय्याने डिलीट करण्यात आलं होत. याबद्दल पुढील तपास सुरु आहे.

<><><><><><>

लंडन इथे सुरु असलेल्या लंडन खुल्या स्क्वॉश स्पर्धांमध्ये भारताच्या वेलावन सेंथिलकुमार ने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्याने दुसऱ्या फेरीत पॅराग्वेच्या फ्रान्सेस्को

मार्कंटो-नीयो चा ११-५,११-७, १४ -१२ असा पराभव केला होता. त्याचा पुढला सामना फ्रान्सच्या अमीर खालेद जोसेलीन याच्याशी होणार आहे.

<><><><><><>

कोल्हापुरात राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे स्थानिक बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या फटाक्यांच्या आवाजाच्या पातळीची चाचणी काल रात्री सायबर कॉलेज मैदानावर घेण्यात आली. विविध प्रकारच्या फटाक्यांच्या आवाजाची तीव्रता यावेळी मोजण्यात आली. शासनाने निश्चित केलेल्या मर्यादेत आवाज असणाऱ्या फटाक्यांच्या विक्रीसाठी परवानगी देण्यात येईल. मर्यादेहून अधिक मोठा आवाज करणाऱ्या फटाक्यांवर बंदी घालण्यात आली असून अशा फटाक्यांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई केली जाईल असं राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

<><><><><><>

महात्मा ज्योतिराव फुले सेवा संकल्प अभियानांतर्गत कोल्हापुरातल्या अन्न धान्य वितरण शहर कार्यालयाकडून शिधापत्रिकांचं वाटप करण्यात आलं. यामध्ये प्रामुख्याने १ हजार २२८ केशरी शिधापत्रिका, ४४४ प्राधान्य कुटुंब लाभार्थी, ३६२ पांढऱ्या शिधापत्रिका तर ७ अंत्योदय शिधापत्रिकांचं वाटप संबंधित लाभार्थ्यांना केल्याची माहिती अन्न धान्य वितरण कार्यालयाने दिली आहे. राज्य शासनाने २०२७ हे वर्ष महात्मा जोतीराव फुले यांचं जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत हे संकल्प अभियान १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राबवलं जाणार आहे.

<><><><><><>

भारतीय नौदलात पाणबुडीविरोधी युद्धनौका अमिनी चा समावेश झाला आहे. या युद्धनौकेच्या समावेशामुळे भारतीय नौदलाच्या पाणबुडीविरोधी कारवाया, किनाऱ्यांची देखरेख आणि समुद्रात सुरुंग पेरण्याच्या क्षमता अधिक सक्षम झाल्या आहेत.

//<><><><><><>//